म. टा. पु. पा. १.

# टँकर उलटला.... पण पायावर निभावले

## विचित्र अपघातातून दुचाकीस्वार बचावला

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये रस्त्यावरून जाणारा एक अवजड टँकर नाल्याचे झाकण तुटल्याने बाजूने जाणाऱ्या दुचाकीवर उलटल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. यात दुचाकीस्वार टँकरखाली सापडला होता. मात्र वाहतूक पोलिसांनी त्याची अवघ्या काही मिनिटांत सुटका केल्याने त्याचा जीव वाचला आहे. या विचित्र अपघातात दुचाकीस्वाराच्या केवळ पायाला दुखापत होण्यावर निभावले. त्यामुळे 'काळ आला होता.. पण वेळ आली नव्हती,' अशी भावना पोलिस व प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली.

मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या वेस्टर्न हॉटेलजवळून गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एक सिमेंट-काँक्रीटचा टँकर हटकेशच्या दिशेने जात होता. यावेळी टँकरचालकाने रस्त्यालगत असलेल्या एका नाल्याच्या झाकणावर आपला टँकर चढवला. त्यामुळे झाकण तुटल्याने टँकर बाजूने जाणाऱ्या दुचाकीवर कलंडला. अपघाताचा मोठा आवाज झाल्याने जवळच कार्यरत असलेले वाहतूक पोलिस व नागरिक मदतीला धावून आले.

दुचाकीस्वार विनोद कुमार विश्वकर्मा हा उलटलेल्या टँकरखाली सापडल्याने पाहणाऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकला. मात्र विनोद याचा केवळ एक पाय टँकरखाली चालकाच्या आसनाची जागा व टँकर यांच्या मध्यभागी अडकल्याचे दिसले. या दुचाकीस्वाराची सुटका करण्यासाठी, याच चौकात उभ्या असलेल्या एका मोठ्या क्रेनला तात्काळ घटनास्थळी पाचारण करण्यात आले. या क्रेनच्या मदतीने दुचाकीस्वाराला केवळ दहा मिनिटांत बाहेर काढण्यात आले.

### वाहतूक पोलिस धावले...

यात दुचाकीस्वाराच्या केवळ पायाला दुखापत झाली आहे. त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काशिमिरा वाहतूक पोलिसांचे पथक तातडीने धावून आल्यामुळे दुचाकीस्वाराला वेळीच मदत मिळाल्याचे मत प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केले. दरम्यान, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रियासुरू असल्याची माहिती काशिमिरा वाहतूक पोलिसांकडून देण्यात आली.

पुढारी पु. पा. ७.

# मिरा रोडमध्ये गुटख्यासह २० लाखांचा मुद्देमाल जप्त

मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा

मिरारोड येथील नयानगर येथे गुटखा वाहतूक करणारा टेम्पो व घरात ठेवलेला अनधिकृतरित्या जवळपास गुटखा असा एकूण २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान दोन आरोपीला अटक करण्यात आली आहे.

नयानगर, पय्याडे हॉटेल येथून एक इसम टेम्पोतून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखु मिश्रीत गुटखा विक्री करण्यासाठी बेकायदेशीर वाहतूक करून घेवून येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कारवाई करण्यासाठी त्या ठिकाणी पोलिसांनी सापळा रचला. पहाटेच्या सुमारास एक टेम्पो (एमएच ४८ बी एम ४२९७) चा चालक हा टेम्पो घेवून येत असतांना दिसला. तो टेम्पो थांबवून त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने रंणजीत राघुजी सदावर्ते (३२, रा. खारबाव, ता. भिवंडी, जि. ठाणे) असे सांगितले. टेम्पोची तपासणी केली असता टेम्पोमध्ये गुटखा असल्याचे दिसून आले.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ७.

# ५० पैशात गोल्ड लोन देतो सांगून बंटी-बबलीचा वसईकरांना गंडा

## बंटीला अटक; व्याजी पैसे देण्याच्या नावाखाली केली लूट

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरारमध्ये बंटी-बबलीने ५० पैशात गोल्ड लोन देतो सांगून अनेक गरजूंना गंडा घातल्याचे उघड झाले असून त्याने आपल्या दुसऱ्या पत्नीच्या नावाने विविध गोल्ड लोन देणाऱ्या बँकेत सोने तारण ठेवून लाखो रुपये उकळले आहेत. एव्हढेच नव्हे तर त्याने अनेकांचे दागिने पैसे देऊन सुद्धा त्यांना ना पैसे दिले ना सोन दिले. या प्रकरणी बंटी आनंद मगदूम याला अटक केली असून त्याच्या व्यवहाराची चौकशी पोलीस करीत आहेत.



विरार पोलीस ठाण्याच्या आवारात जमा झालेल्या या महिला आणि पुरुष आहेत. त्यांनी कोणी शाळेची फी भरण्यासाठी गोल्ड लोन घेतले तर कोणी कोरोनामधील झालेले रुग्णालयाचे बिलाची परतफेड करण्यसाठी गोल्ड लोन घेतले होते. सुरवातीच्या काळात अनेकांना त्यांचे दागिने आणि पैसे परत केले होते. त्यामुळे त्याच्यावर विश्वास वाढला होता. विश्वास संपादन करून त्याने एक दोन नव्हे तर १८ जणांना चुना लावल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

आनंद आणि वृषाली कदम (मगदूम) ह्या जोडगोळीने लोकांना सोन्यावरती १०० रुपयांना ५० पैसे व्याजदराने आम्ही पैसे देऊ असे आमिष दाखवून लोकांचा विश्वास संपादन करून अनेकांना करोडोंचा गंडा घातला आणि पसार झाला होता.

पीडित साक्षी सूर्यवंशी यांनी त्याचा शोध घेण्यासाठी जंग जंग पछाडले आणि परागंदा झालेल्या आनंदला पीडितांनी पकडून पोलिसांच्या मदतीने अटक केले आहे. आपले बँकेचे सिव्हील खराब होवू नये म्हणून प्रख्यात बँकांतील दागिने काढून या आनंदला लोकांनी दिले. मात्र त्याने ते सर्व दागिने पीडितांच्या नावे न ठेवता त्याने स्वतःच्या बायको , मेव्हणी व इतर लोकांच्या नावे ठेवायचा शेवटी पीडितांनी शोधून पोलिसांना दिले. पोलिसांनी या मगदूम सोबत असणाऱ्या सर्व नातेवाईकांची चौकशी करून त्याची संपत्ती जप्त करून लोकांचे दागिने मिळवून द्यावे, अशी मागणी पीडितांनी केली आहे.

### भाईंदरमध्ये १० लाखांची घरफोडी

मिरारोड : भाईंदर पश्चिमेच्या गीतापार्क इमारतीत राहणारे श्रीकृष्ण वटा हे १२ एप्रिल रोजी सायंकाळी क्रोमा येथे एसी खरेदी करण्यासाठी गेले असता अज्ञात चोरट्यांनी घराचा टाळा तोडून १८९ ग्रॅम वजनाचे सोने, १७ हजार रुपयांची पाव किलो चांदी व ५० हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पश्चिमेला राहणारे श्रीकृष्ण वटा हे डायमंड कंपनीत नोकरीला असून ते नवीन एसी आणण्यासाठी आपल्या कुटुंबासह घरातून आठ वाजता क्रोमा येथे गेले होते. ते पुन्हा ९ वाजता घरी आले असता त्यांच्या घराच्या दरवाजाचा टाळा तोडुन अज्ञात चोरट्यानी घरातील कपाटाची तिजोरी तोडुन कपाटातील सोन्याचे व चांदीचे दागीने आणि रोख रक्कम असे घरफोडी करून नेले आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे सोन्याचे दागिने व पाव किलो चांदीचे दागिने व ५० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १० लाख ६२ हजारांचा मुद्देमाल पळवला.

पुढारी पा. नं. ५.

# नवघर पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक

मिरारोड : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाण्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व रमझान निमित्त शांतता मोहल्ला कमिटीची बैठक बोलावण्यात आली होती.. नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार व पोलीस निरीक्षक प्रकाश मासाळ यांनी मार्गदर्शन करत सर्व उपस्थितांना सुचना केल्या. तसेच मीरा भाईंदर शहरात विविध जाती, धर्माचे नागरिक राहतात. यावेळी शांतता व कायदा सुव्यवस्था बिघडू नये अशाप्रकारे सण उत्सव साजरे करा असे सांगितले. मीरा भाईंदर शहरात धार्मिक संणाच्या दरम्यान शांतता व पोलीस ठाणे कार्य क्षेत्रामध्ये जातीय तणावाच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था, जातीय सलोखा व शांतता राखण्याच्या दृष्टीने नवघर पोलीस ठाणे शांतता मोहल्ला समितीची बैठक घेण्यात आली. या समितीची बैठक नवघर पोलीस ठाण्यातच संपन्न झाली.

जातीय तणावाच्या परिस्थितीमध्ये कायदा व सुव्यवस्था, जातीय सलोखा व शांतता राखण्याच्या दृष्टीने व पोलीस स्तरावर तसेच जातीय तणावाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या ठिकाणी शांतता समिती स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून परिपत्रक जारी करण्यात आले होते.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु.पा.३.

# सनसिटी, एव्हरशाईन रस्त्यांची उंची वाढवल्यास 'जलकोंडी' होणार?

## शेतीसह वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याची वसईकरांना भीती

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

नवघर माणिकपूर शहरातील सनसिटी आणि एव्हरशाईन हे दोन प्रमुख रस्ते अतिवृष्टीमुळे पाण्याखाली जाऊन रहदारी बंद होण्याची समस्या गेल्या काही वर्षांपासून गंभीर स्वरूपात समोर येत आहे. ती दूर करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने हे रस्ते अडीच फूट उंच करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यामुळे इतर भागातील शेती आणि वस्तीत पाणी शिरून अन्य नागरिकांना मोठा त्रास होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

सनसिटी गास रस्ता अडीच फूट उंच उंचलून नव्याने बनवला, तर चुलना परिसर अगोदरच गेली कित्येक वर्ष अतिवृष्टीच्या पाण्याचा निचरा न झाल्याने पाण्याखाली जात आहे, त्यात हा रस्ता केल्याने संपूर्ण चुलना परिसरातील घरे शेती पाण्याखाली जातील. रस्ता उंच करत असताना ज्या उघाड्या असतील त्याची क्षमता परिपूर्ण असेल का ?असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

गेली कित्येक वर्ष दोन तीन दिवसाच्या सलग



पावसामुळे पाच सहा दिवस पाण्याचा निचरा न झाल्याने वसईचा काही भाग पाण्याखाली असतो. हा रस्ता जर अडीच फूट उंच केला तर पाण्याचा निचरा होण्यासाठी जास्त दिवस लागतील.

वसई पूर्वचा ब्रिज उतरल्यानंतर एव्हरशाईन पर्यंत जो महामार्ग आहे. तो देखील अतिवृष्टीमुळे पाण्याखाली जातो आणि रहदारी बंद होते. तो रस्ता देखील अडीच फूट उंच उचलला तर ओमनगर कृष्णाटाऊन, मानवमंदिर डी.जी.नगर, सनसिटी,

> "आचोळा, राजावली, नायगाव खाड्यातून पूर्वी १२ टनाच्या बोटी जायच्या. पापडी, समेलपाडा येथे बोटी दुरुस्त कारखाने होते. शहर वसवत असताना या खाड्यांना गटाराचे स्वरूप दिले गेले आहे. सर्व बाबींचा विचार करुनच ठोस कार्यवाही व्हावी.
>
> - मिलिंद चव्हाण, माजी उपशहरप्रमुख

पूर्वकडील मिठागर हे परिसर पाण्याखाली जातील त्याच बरोबर वसंतनगरी रस्ता व परिसर देखील पाण्याखाली जातील. अतिवृष्टीमुळे रहदारी बंद पडू नये, म्हणून रस्ता उंच करत असताना नवीन समस्या देखील उद्भवत नाही ना? यावर विचार करणे आवश्यक आहे. हा महामार्ग महानगरपालिकेच्या अखात्यारित येत नसताना देखीलबांधकाम निविदा काढणे कितपत योग्य आहे? हा प्रश्नच आहे.

सामना पा.नं.५.

# वसईत पाण्यासाठी ठिय्या आंदोलन

वसई, दि. १३ (सा.वा.) – पालिका क्षेत्रातील अमोलनगर, मरिअमनगर, परेरानगर, डायसनगर, नायगाव पश्चिम येथील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याच्या निषेधार्थ आज तीव्र आंदोलन छेडण्यात आले. लवकरात लवकर पाणीटंचाई संपुष्टात आली नाही तर रेल रोको करण्याचाही इशारा दिला आहे.

वसई-विरारमध्ये गेल्या १५ दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाई सुरू झाली आहे. त्याचा सर्वाधिक फटका परिसरातील नागरिकांना बसत आहे. अनेक भागांत तर अशुद्ध पाणीपुरवठा होतो. पाणीटंचाईचा फायदा टँकर लॉबी घेत असून जादा पैसे देऊन हे टँकर विकत घ्यावे लागत आहेत. स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात वसई-विरार महापालिकेकडे अनेकदा निवेदने दिली. पण त्याची दखल घेण्यात आली नाही.

आज अखेर नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला आणि रस्त्यावर उतरून ठिय्या आंदोलन केले. त्यात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. विशेषत: नायगावमधील नागरिक अधिक आक्रमक झाले. एकीकडे नवीन बांधकामांना महापालिका पाणी देत असतानाच दुसरीकडे नागरिकांना प्यायलाही पाणी मिळत नाही. सध्या कमी पाण्यामुळे प्रचंड हाल सुरू असून पाणीटंचाई संपुष्टात आणली नाही तर रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५-५-१.

# इराणी सोनसाखळी चोरास आंबिवलीतून अटक

## सात गुन्हे उघडकीस, ३ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त

मीरारोड : माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत सोनसाखळी चोरी करणाऱ्या इराणी आरोपीस वसई गुन्हे शाखेने धडक कारवाई करून आंबिवलीतून अटक केली. आरोपीकडून ३ लाख ३२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला असून त्याने विविध पोलीस ठाणे हद्दीत केलेले ७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. दरम्यान या गुन्हेगाराची पार्श्वभूमी पाहता तो पोलीसांवर हल्ला करतो हे ठाउक असल्याने पोलीस पथकाने आरोपीला कोणताच सुगावा लागून न देता त्याची तीन तास वाट पाहत त्याच्यावर झडप घातली.

वसई पश्चिम येथून किरण अशोक मंगिया (६२) या त्यांच्या सुनेबरोबर स्कुटीवरून कार्यक्रमासाठी जात असताना त्यांच्या पाठीमागून दुचाकीने येउन पाठीमागे बसलेल्या एकाने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून पोबारा केला. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये सतत होणाऱ्या सोनसाखळी चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे अधिकारी व अंमलदार यांनी कंबर कसली. पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हयाच्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले होते. अब्बास अमजद ईराणी (२४) रा. फातिमा मंजील, आंबिवली पाटील नगर ता. कल्याण हा या तपासात आढळून आला. आरोपी हा आंबिवली ईराणी वस्तीतील रहिवासी असल्याने आरोपीची दैनंदिन माहिती घेवून यापूर्वी ईराणी वस्तीमध्ये आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या तपास पथकावर हल्ला होण्याच्या बऱ्याच घटना घडलेल्या असतानाही सर्व बाबींची योग्य सांगड घालून सापळा रचून कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार याची काळजी घेत तब्बल तीन तास वाट पाहत आरोपीस अटक केली.




### पोलीस पथक तीन तास बसले होते दबा धरून!

आरोपीची कसून चौकशी केली असता ७ गुन्हे उघडकीस आणले. गुन्हयात चोरी करण्यासाठी वापरलेल्या मोटार सायकल सहीत गुन्हयात चोरीस गेलेले ८७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा ३,३२,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपी याच्या विरोधात संघटीत गुन्हेगारीचे २ गुन्हे, जबरी चोरीसह दुखापतीचे २१ गंभीर गुन्हे ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत. पोलीसांनी धाडसाने कारवाई करत केलेल्या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पुण्यनगरी ५-५-१.

# दुचाकीस्वाराच्या अंगावर मिक्सर पडूनही वाचला

**मीरा रोड** : काशिमीरा येथे गुरुवारी सकाळी दुचाकीस्वार रस्त्याने जात असताना त्याच दिशेने सिमेंट मिक्सर जात होता. गटाराच्या झाकणावर जात असताना ते झाकण खाली जाऊन वाहन उलटले या गाडीखाली दुचाकीस्वार अडकला. वाहतूक पोलिसांनी तत्काळ मदत करून क्रेनच्या साहाय्याने त्याला गाडी बाहेर काढले. त्याचे नशीब बलवत्तर म्हणून तो वाचला.



काशिमीरा येथील सगणाय देवी मंदिराच्या बाजूने हटकेश मीरारोड येथे जाण्यासाठी मीठा रस्ता आहे. या रस्त्यावरून गुरूवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास वेस्टर्न हॉटेलशेजारी सिमेंट मिक्सर चालकाने गाडी गटाराच्या झाकणावर घातल्याने ते झाकण तुटून गटारात पडल्याने चालकाचा टँकर वरील ताबा सुटला व तो टँकर पलटी होउन दुचाकीस्वार विनोद कुमार विश्वकर्मा याच्या अंगावर पडला. यावेळी काशिमिरा वाहतूक शाखेचे एपीआय कतुरे, कड, पोलीस हवालदार गीते, घुगे व बत्ते यांनी धाव घेत दुचाकीस्वारास वाचवले. त्याचे नशीब बलवत्तर म्हणून तो वाचला, त्याच्या पायाला जखम झाली आहे. मिक्सर वाहनचालकाविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

म-रा. पु-पा. ७.

# वसईत रिक्षा वाढल्या

## वर्षभरात अडीच हजार रिक्षांची भर; अनधिकृत गाड्यांचाही उपद्रव

वैष्णवी राऊत, वसई

वसई-विरारमधील रिक्षांच्या संख्येत २०२२-२३ या आर्थिक वर्षात दोन हजार ५८० रिक्षांची भर पडली आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत या वर्षभरात दोडपट वाढ झाली आहे. महापालिका हद्दीत अधिकृत रिक्षा थांबे नसल्याने निम्म्याहून अधिक रस्ता हा रिक्षांमार्फत अडवण्यात येतो. त्याशिवाय, अनधिकृत रिक्षादेखील रस्त्यावर धावत असल्याने या कोंडीत भरच पडत आहे.

वसई-विरार शहरात रिक्षांची संख्या बेसुमार वाढली आहे. साधारण ३२ हजारांच्या घरात रिक्षा सध्या वसईच्या रस्त्यांवर धावत आहेत. त्यातच २०२२-२३ या आर्थिक वर्षात दोन हजार ५८० रिक्षांची भर शहरातील रस्त्यांवर पडली आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत एका वर्षात झालेली ही दोडपट असल्याचे वसई उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून सांगण्यात आले. वाढत्या रिक्षांना शहरातील रस्ते अपुरे पडू लागले आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन करत भरधाव वेगात या रिक्षा धावत असतात. त्याचा त्रास सामान्यांना सहन करावा लागत आहे. रिक्षा थांब्यावरील गर्दी वाढत आहे.

शहरात एकही अधिकृत रिक्षा थांबा नाही. उपलब्ध असलेले अनधिकृत रिक्षा थांबेदेखील अपुरे पडत आहेत. त्यामुळे शहरात जागोजागी बेकायदा रिक्षा थांबे तयार होत आहेत. अनेक राजकीय पक्षांनी आपल्या रिक्षाचालक संघटना स्थापन केल्या असून, नाक्यानाक्यांवर रिक्षा थांबे तयार केले आहेत. अशा बेकायदा रिक्षाथांब्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. दुसरीकडे, परिवहनचे काही बसथांबेदेखील रिक्षाथांब्यांमागे लपल्याने प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

### अधिकृत थांबे गरजेचे

वाहतूककोंडी कमी करणे, रिक्षावाहतुकीला शिस्त लावणे आणि रिक्षाचालकांमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासावर तोडगा काढण्यासाठी महापालिका प्रशासनाने आधीच मंजूर केलेले १४५ अधिकृत रिक्षा थांबे लवकरात लवकर तयार करावे, अशी मागणी भाजपचे मनोज पाटील यांनी पालिकेकडे केली आहे.



### धूर ओकणाऱ्यांवर हवी कारवाई

वसई-विरार रस्त्यांवर अवैध रिक्षांचा सुळसुळाट वाढला आहे. यामुळे प्रदूषणात भर पडत आहे. दुसरीकडे वाहतूक कोंडीमध्येही भर पडत आहे. आधीच वसई-विरार महापालिकेतर्फे वायुप्रदूषण नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र त्याला गती येणे आवश्यक आहे. एकीकडे पालिका विविध उपाययोजना करण्यासाठी आग्रही असताना, दुसरीकडे रस्त्यांवरील धूर ओकणाऱ्या रिक्षांमुळे हवेमध्ये प्रदूषणात भर पडत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे अशा रिक्षांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

- अधिकृत रिक्षा थांब्याचा अभाव
- अनेक ठिकाणी रस्त्यावर अतिक्रमण
- अनधिकृत रिक्षांची संख्याही मोठी असल्याचा अंदाज

**रिक्षांची नोंदणी**

| वर्ष | संख्या |
|---|---|
| २०२०-२१ | ८३९ |
| २०२१-२२ | १,५२५ |
| २०२२-२३ | २,५८० |

लोकमत

# वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या दलालास अटक

## अनैतिक मानवी वाहतूक कक्षाची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वेश्यादलाल राजू ऊर्फ मोजाम अली शेख (३८) व नरेश हे पीडित महिलांना पैशाचे आमिष दाखवून ग्राहकांना वेगवेगळ्या ठिकाणी बोलावून त्यांच्याकडून महिला पुरविल्याच्या बदल्यात मोबदला स्वीकारतात. हे दलाल बुधवारी माणिकपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वसईच्या पांचाळनगर येथे वेश्यागमनाकरिता महिला पुरविणार आहेत, अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. त्याअनुषंगाने पोलिसांच्या पथकाने कारवाई करीत वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या एका दलालास अटक करून पीडित महिलेची सुटका केली आहे.

माणिकपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपाराचे पोलिस निरीक्षक संतोष चौधरी, पोलिस उपनिरीक्षक निकम, पोलिस हवालदार रोशन किणी, पवार, पद्माने, राऊत, शेट्ये, पागी, महिला पोलिस तिवले, भोर यांनी केली आहे.

### पीडितेची सुटका

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपाराचे पोलिस निरीक्षक संतोष चौधरी यांनी ही माहिती वरिष्ठांना देऊन कायदेशीर बाबींची पूर्तता करून पोलिस स्टाफ, बोगस गिऱ्हाईक व दोन पंचांसह सापळा कारवाई केली. आरोपी राजू ऊर्फ मोजाम अली शेख (३८) याला ताब्यात घेतले आणि एका पीडित महिलेची वेश्या व्यवसायापासून सुटका करण्यात आली.

Hello Vasai
Page No. 4 Apr 14, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

दैनिक

# मुंबई केसरी टाइम्स


R.N.I. NO MAHHIN/2008/25162

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई. www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १५ | अंक : 306 | शुक्रवार १४ एप्रिल २०२३ | मूल्य 2 रुपए | Post-Reg- No. PLG/249/2023/2025 | पृष्ठ : 08

## देहव्यापार पर पुलिस की कार्रवाई ,एक दलाल गिरफ्तार, महिला को छुड़ाया

**बसई :** वेश्यावृत्ति में लिप्त होने के लिए प्रोत्साहित करने वाले वेश्यादलाल की गिरफ्तारी और पीड़ित महिला को छुड़ाने में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा की टीम ने सफलता पाई है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा के (पुलिस निरीक्षक ) संतोश चौधरी,पो.उप नि निकम की टीम ने की है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है। पुलिस ने बताया कि अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा को एक मुखबिर के माध्यम से सूचना मिली कि,वेश्यादलाल (१) राजू उर्फ मोजाम अली शेख (३८) व (२).नरेश ने पीड़ित महिलाओं को पैसे का लालच देकर व विभिन्न ग्राहकों को विभिन्न स्थानों पर आमंत्रित कर तथा वेश्यावृत्ति के लिए महिलाओं को प्रदान करने के बदले उनसे भुगतान स्वीकार करते है।१२ अप्रैल को मानिकपुर पुलिस थाना क्षेत्र के पांचाल नगर वसई (पश्चिम) में वेश्यावृत्ति के लिए महिलाओं को उपलब्ध कराएगी।मिली सूचना के आधार पर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी ने इसकी जानकारी वरिष्ठों को दी,पुलिस कर्मचारियों, बोगस ग्राहक व दो पंच के साथ,उपरोक्त स्थान पर ट्रैप ऑपरेशन किया.इस दौरान आरोपी का नाम राजू उर्फ ??मोजाम अली शेख उम्र ३८ वर्ष,निवासी- रहमतनगर नालासोपारा के पूर्व को हिरासत मे लिया,उक्त कार्रवाई में गिरफ्तार आरोपी के पास से अपराध में प्रयुक्त एक्टिवा वाहन सहित ६६,३५०/- रुपये मूल्य की संपत्ति जब्त की गई है।इस मामले में गिरफ्तार आरोपी व वांछित आरोपी के खिलाफ माणिकपुर थाने में कलम ३७० (१) (२),३४ व अन्य धाराओं के तहत केस दर्ज किया गया है।




Scanned with CamScanner

लोकमत

# खून करून १६ वर्षे फरार आरोपी मीरा रोडमधून जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : १६ वर्षांपूर्वी झालेल्या खुनाचा गुन्हे शाखेने उलगडा करून दोन आरोपींना उत्तराखंडमधून अटक केल्यानंतर मीरारोड येथून तिसऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात आल्याची माहिती बुधवारी देण्यात आली आहे.

१३ डिसेंबर २००७ रोजी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील गुरुकृपा हॉटेलच्या समोरील झाडीत एका तरुणाचे प्रेत सापडले होते. याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर तपासादरम्यान मयताचे नाव संजय विनोद झा असे असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. संजय झा गारमेंट फॅक्टरीत प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून काम करीत होता. तिथून मिळालेली माहिती, गुप्त बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाद्वारे पुरणसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ पुरणसिंग कापुरसिंग परिहार आणि मोहनसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ मोहनसिंग कापुरसिंग परिहार या दोन आरोपींना बागेश्वर, उत्तराखंड येथून १६ वर्षांनी २० मार्चला ताब्यात घेतले होते. आर्थिक व्यवहाराच्या वादातून संजय झा याची हत्या करून त्याचा मृतदेह झाडीत फेकण्यात आल्याचे या दोघांनी कबूल केले होते. हत्येनंतर १६ वर्षांपासून हे आरोपी उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश येथे आपले अस्तित्व लपवून राहत होते. मात्र, गुन्हे शाखा-३ च्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या होत्या.

Hello Vasai
Page No. 4 Apr 14, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# शालेय विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन

मीरा रोड - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयच्या हद्दीत शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांच्या अनुषंगाने जनजागृती व्हावी याकरिता वेदांत इंटरनॅशनल स्कूल व ज्युनियर कॉलेज येथे सायबर गुन्हे कक्षाकडून शालेय विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. संवाद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना दैनंदिन

राम... सर्वात लवकर
स्टेक
(वेदना निवारक) टॅब्लेट
डोकेदुखी
सांधेदुखी
कंबरदुखी
मुरगा व सूज

सोशल मीडिया वापराबाबत व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत जनजागृती करण्यात आली, तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज, त्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांच्या उपस्थितीत पार पडले.

Scanned with CamScanner

# वर्क फ्रॉम होम करताना दक्षता घेण्याचे आयुक्तालयाकडून आव्हान

भाईंदर - वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली बऱ्याचदा अनेकांची फसवणूक करण्यात येते. त्यामुळे मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने शहरातील नागरिकांना वर्क फ्रॉम होमच्या नावाने होणाऱ्या फसवणुकी संदर्भात नागरिकांनी दक्षता घ्यावी व अशाप्रकारे होणाऱ्या फसवणुकीबाबत सतर्क राहावे असे आयुक्तालयाच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे. अशाप्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात अथवा सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून देखील तक्रार देण्यास सांगण्यात आले आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याच प्रमाणामध्ये सायबर गुन्ह्यांची संख्याही देखील वाढली आहे. सायबर गुन्हेगार लोकांना वेगवेगळ्या मार्गाने गंडा घालण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना सायबर सुरक्षेबाबत कल्पना असते ते यामधून वाचतात. मात्र बहुतांश लोक सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सहज अडकले जातात. सध्या घरी बसल्या बसल्या सोशल मीडियावर काही तासांमध्ये घरून काम करून पैसे कमवा अशी जाहिरात करून लिंक पाठविण्यात येते. त्याद्वारे चॅट बॉक्स ओपन झाल्यानंतर वेबसाइटची लिंक पाठवून त्यात स्वतःच्या नावाचे नोंदणी करण्यास सांगून सुरुवातीला पैसे पाठवून विश्वास संपादन करून कमीशनच्या नावाने पैसे पाठविण्यास सांगून फसवणूक करण्यात येते, तसेच वेगवेगळ्या टास्कमध्ये रिव्हयु करा, टॅग करा, लाइक्स करा असे करून तुम्हाला १०,०००/- रुपये मिळतील, परंतु त्याकरिता तुम्हाला पॅकिज घेतल्यानंतर मोठ-मोठ्या रक्कमेचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात येते.

सायबर गुन्हे कक्ष, मि.भा.व.वि. यांच्याकडून दक्षता घेण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. त्यात अनोळखी नंबरवरून आलेल्या एसएमएस लिंकवर क्लिक करू नये. आपली गोपनीय माहिती वेबसाइटवर भरण्यापूर्वी नमूद वेबसाइटचा यु.आर.एल. काळजीपूर्वक तपासा. बँकेच्या कार्ड तपशील, पिन, ओ.टी.पी., पासवर्ड इत्यादी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करू नका. लिंकवर क्लिक करण्यापूर्वी आधी विचार करा. टेलीग्राममध्ये येणाऱ्या फसव्या लिंक्सवर क्लिक करू नये. नामांकित कंपन्यांमध्ये वर्क फ्रॉम होमद्वारे पैसे कमावण्याचे आमिषाला बळी पडू नका असे सांगण्यात आले आहे.

Scanned with CamScanner